॥ सोऽहं ॥

# स्वामी स्वरूपानंद, पावस.
# अल्प परिचय

श्री सद्‌गुरुकृपेनें ज्यांनी ज्ञानेश्वरीसारख्या गीता-अलंकाराला अभंगाचें लेणें लेवविले, ब्रह्मानंदलहरी अशी ज्ञानेश्वरी अभंग-पात्रांतून सामान्य वाचकांपुढे ठेविली त्या श्रीस्वामी स्वरूपानंदांविषयीं कांहीं माहिती असावी अशी जिज्ञासा वाचकांना सहज होणारी असल्यानें हा परिचय देत आहे.

## कुलवृत्तांत

रत्नागिरी जिल्ह्यांत रत्नागिरी शहरापासून सुमारें ८ मैलांवर पावस या नांवाचें एक खेडेगांव आहे. स्वामींचे पूर्वज गोविंदभट गोडबोले हे दहा पिढ्यांपूर्वी कासार-वेली या गांवांतून पांवसला आले. तेथें ४-६ पिढ्या भिक्षुकीच्या व्यवसायांत गेल्या. पांवस येथें गोडबोले घराण्याचा विस्तार झाला. घराण्याचा लौकिक पसरला. स्वामीजींचे आजोबा पर्शरामपंत हे शिक्षण खात्यात अधिकारी होते. त्यांचें घर म्हणजे अतिथिअभ्यागतांचें माहेरघरच होतें. पर्शरामपंतांचे द्वितीय पुत्र विष्णुपंत हेच स्वामीजींचे पिताजी होत.

## मातापितरें व भावंडे

वडील विष्णुपंत यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें होतें. तथापि, जात्याच ऐश्वर्याची व मानमान्यतेची आवड नसल्यानें घरीं राहून भगवच्चिंतनांत काळ घालवावा असें त्यांनी ठरविलें. घरची सांपत्तिक स्थिति त्यांच्या वृत्तीला पुरेशी होती. १९२० मध्यें पुण्याचे सद्‌गुरू गणेश नारायण तथा बाबा महाराज वैद्य यांचा त्यांना अनुग्रह लाभला व त्यांच्या मूळच्या सत्प्रवृत्तींना गुरूकृपेचें अमृतसिंचन मिळालें. स्वामीजींच्या मातोश्री सौ. रखमाबाई ‘संसार’ आणि ‘परमार्थ’ या दोहोंतील दक्ष होत्या. त्यांनाहि १९३० मध्ये सद्‌गुरू बाबा वैद्य यांचा अनुग्रह लाभला. स्वामीजींना दोन बंधु व चार बहिणी. घरांत सांप्रदायिक वातावरण असल्याने परमार्थविषयांत घरांतील सर्वच मंडळी कमीअधिक प्रमाणांत संस्कारित झाली होती.

## जन्म, बालपण व शिक्षण

स्वामीजींचा जन्म मार्गशीर्ष वद्य १२ शके १८२५ दिनांक १५-१२-१९०३ चार घटका रात्री पांवस येथेंच झाला. शोभन नाम संवत्सर होता. नांव रामचंद्र ठेवण्यात आलें. बालपणांत उत्तमोत्तम संस्कारहि लाभले. पूर्वपुण्याईचा अपूर्व साठा घेऊनच ते जन्माला आले असल्याने शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणे त्यांची जीवनप्रभा फांकू लागली. बालपण म्हणजे क्रीडासक्त जीवन असावयाचें, परंतु त्यांचे वर्तन हे क्रीडासक्त नसून फारतर क्रीडायुक्त होते असे म्हणतां येईल. आसक्त होतें तें गीतेचें अध्ययन करण्यांत, देवादिकांच्या गोष्टी ऐकण्यांत. 'बाल्यापासुनि गीताध्ययनीं होता मज बहु छंद' असे त्यांनींच म्हटले आहे. वयाच्या पांचव्या वर्षी शालेय शिक्षणाला सुरुवात झाली. मराठी पांचव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण पांवस येथें झाल्यानंतर इंग्रजी पांचवीपर्यंतचे शिक्षण रत्नागिरी येथें झालें. पुढील शिक्षणाकरिता ते मुंबईला आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या आंग्रेवाडीतील विद्यालयात गेले. संस्कृत विषय आवडीचा असल्याने त्या विषयांत त्यांची प्रगती अप्रतिम होती, अलौकिक बुद्धिमत्तेमुळें सर्वच विषयांत ते पारंगत होऊं पहात होते. त्याचवेळीं पारतंत्र्यात पिचत पडलेल्या देशाच्या स्वातंत्र्याचे वारें तरुणांत नवचैतन्य उत्पन्न करीत होतें. अशा वेळीं स्वामींनींहि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली असहकारितेच्या आंदोलनात भाग घेण्यासाठी 'प्रिलिमिनरी' परीक्षा होण्यापूर्वीच शाळा सोडली व १९२२ मध्यें टिळक विद्यापीठाची प्रवेश परीक्षा ते उत्तीर्ण झाले. या शैक्षणिक कालखंडातहि त्यांचे अध्यात्म विषयाचें वाचन, श्रवण, मनन, निदिध्यासन चालूच राहिलें होतें. तीव्र मुमुक्षुत्व उत्पन्न झाल्यानें सद्‌गुरूकृपेची तळमळ उत्पन्न झाली. अशावेळी त्यांचे मामा केशवराव गोखले हे स्वामीजींना आपल्या महाराजांकडे पुण्यास घेऊन गेले. सद्‌गुरू बाबा महाराज हे नाथ-संप्रदायांतील थोर सत्पुरुष होते. त्यांचा अनुग्रह १९२३ मध्ये स्वामीजींना झाला आणि वृत्ति निजानंदांत रंगू लागली.

## स्वावलंबनाश्रम व सामाजिक कार्य

स्वामीजीं पांवस येथेंच राहू लागले. राष्ट्रोद्धारासाठीं तरुणांना स्वावलंबनपूर्वक राष्ट्रीय शिक्षण दिलें पाहिजे असें ठरवून त्यांनीं स्वावलंबनाश्रम या नांवाचा एक आश्रम काढला. स्वामींच्या स्वावलंबनाश्रमांतील शिक्षण बहुविध आणि अभिनव होतें. हायस्कूलचे सर्व शिक्षण देणें हा हेतू होताच. परंतु त्याचबरोबर विद्यार्थी अष्टपैलू व्हावा असे प्रयत्न तळमळींने, काळजीपूर्वक केले जात होते. सूतकताई, खादी विणणें, मल्लखांब खेळ वगैरे व्यायाम, लाठीचे हात, लेझीम वगैरेंचे शिक्षण दिलें जात होतें. त्याचप्रमाणें गांवांतील सार्वजनिक उत्सवांतील हीन अभिरुचि कमी व्हावी म्हणून राष्ट्रीय मेळे, प्रवचनें वगैरे कार्यक्रमहि त्यांनी सुरू केले. स्वामीजींच्या या सर्वस्पर्शी कार्यामुळें ते लोकादराला पात्र ठरले.

सन १९२७ पर्यंत स्वावलंबनाश्रमाचें कार्य चालूच राहिलें. सरकारी रोषाच्या भीतीने शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या घटत घटत तीसवरून चारपांचपर्यंत आली. सर्व देशांतहि राष्ट्रीय शाळांची हीच स्थिति होऊन बहुतेक शाळा बंदच पडल्या होत्या. शेवटीं राहिलेल्या तीन विद्यार्थ्यांना टिळक विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेला बसवून व स्वावलंबनाश्रम बंद करून त्यांच्यासह टिळक महाविद्यालयांत उच्च शिक्षण घेण्याकरितां स्वामीजीं पुण्यास गेले.

पुण्यास गेल्यानंतर तेथें स्वावलंबनानेंच शिक्षण घेणें आवश्यक असल्यानें त्यांना द्रव्यार्जनासाठीं अनेक प्रकारें कष्टाची कामें करावीं लागली. विद्यार्थ्यांकरितांहि कांहीं अर्थार्जन त्यांना करावें लागत होतें. सन १९३२ मध्यें सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेऊन येरवडा जेलमध्ये त्यांनी कारावास भोगला.

सद्‌गुरूंचा अनुग्रह लाभल्यापासून त्यांची आध्यात्मिक तयारी अप्रतिहत वाढत होती. अनुग्रहानंतर चार-पाच वर्षांनी त्यांनीं स्वहस्ते एक ज्ञानेश्वरीची प्रत लिहून ती सद्‌गुरूंना अर्पण केली होती. राजकारण, समाजकारण व शिक्षण या सर्व क्षेत्रांत सर्व शक्तिनिशीं भाग घेत असूनहि हें सर्व अलिप्तपणे करण्याचें कौशल्य त्यांना लाभलें होतें.

वयाच्या ३१ वर्षांपर्यंत टिळक महाविद्यालयांत त्यांचें वाङ्‌मय विशारदचें शिक्षण झालें, आणि १९३४ सालीं त्यांना जबरदस्त आजाराचा तडाखा बसला. त्यावेळीं ते आपल्या घरीं पांवस येथें होते. थकवा इतका प्रचंड होता कीं, डोळे उघडण्याचेंहि त्राण नव्हतें. आपला मृत्यू समीप आला असें त्यांना वाटलें. या मृत्यूच्या भीतीनेंच ते खरे अजरामर झाले. कारण या भीतींतून भक्तीचा उदय झाला. जगन्माऊलीची दृढतम भक्ति उत्पन्न झाली. ते चार महिने अंथरूणाला खिळून होते. परंतु ह्या चार महिन्यांत भाव साम्राज्याच्या सिंहासनावर बसून त्यांनी भक्तिसुखाचें वैभव भोगलें. भक्तिबळानें अहंकाररूपी संसार-शत्रूला त्यांनीं मृत्युपंथाला लावलें आणि आपलेंच मरण आपण पाहून याच देंही पुनर्जन्माचें सुख कसें भोगलें हे सर्व वर्णन त्याचवेळीं उत्स्फूर्त अशा काव्यांत लटपटत्या हातांनी त्यांनीं लिहून ठेवलें आहे. अमृतधारा या नांवानें या स्फुट काव्याचा संग्रह प्रकाशित झालेला आहे.

या दीर्घ आजारानंतर प्रकृति क्रमशः सुधारत गेली. नंतर त्यांचें वास्तव्य त्यांच्याच गांवातील अण्णा देसाई यांच्याकडेच होते. एक मैलभर फिरण्याइतकी प्रकृति आता सुधारत होती. परंतु देहाला हिंडवणारे मन आतां आत्मसुखांतच रंगू लागल्याने आसनस्थ होऊन स्वसुखांत रममाण होण्यांतच त्यांचा बहुतेक काळ सार्थकीं लागूं लागला. या साधनकाळांतच त्यांना सगुण साक्षात्कारहि झाला. महासमाधिपर्यंत स्वामीजींचे वास्तव्य श्री. देसाई बंधु यांच्या घरीच होते.

## वाङ्मयसंपदा

आनंदाचे अनुकार अशा स्वरूपांतच या पुढील काळांत त्यांची वाङ्मयसृष्टी निर्माण झाली. गीतेवरील 'भावार्थ गीता' हा साकीबद्ध अनुवाद त्यांनीं प्रथम केला. यानंतर 'संजीवनी गाथा' या नांवानें प्रकाशित झालेल्या अभंगांची रचना झाली. याच अभंग-रचना-काळांत त्यांचें 'स्वामी' हें नांव रूढ झालें. 'स्वरूपानंद' हें लाडकें नांव त्यांना त्यांच्या सद्गुरूंनीच ठेवलें होते. आणि येरवडा तुरुंगांत असतांना त्यांचे स्नेही त्यांना कौतुकानें 'स्वामी', 'मुनि' अशा नांवांनी संबोधित. आता स्वामी स्वरूपानंद या नांवानें ते ओळखले जाऊ लागले.

भावार्थ गीता आणि संजीवनी गाथा या दोन प्रासादिक ग्रंथांच्या प्रकाशनानंतर त्यांची खरी योग्यता जाणत्या माणसांना ज्ञात होऊं लागली. अप्रसिद्ध असलेले स्वामीजी सुप्रसिद्ध होऊं लागले. लोकसंग्रह वाढूं लागला. त्यांची शिष्यसंख्याहि वाढू लागली. ज्ञानेश्वरीवर त्यांनी सुबोध आणि रसाळ असा अभंगात्मक  अनुवाद लिहिल्यानें सर्वसामान्यांच्याहि आटोक्यात ज्ञानेश्वरीचा भावार्थ येऊं लागला. 'अमृतानुभव' आणि 'चांगदेव पासष्टी' यांचेहि अभंगात्मक अनुवाद त्यांनीं केले. अशा प्रकारें प्रासादिक काव्यप्रतिभेचा आविष्कार होऊन ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला.

त्यांचे शारीरिक बळ वयोमानानें कमी होत गेलें. परंतु त्यांच्या दैवी संपत्तीचा ठेवा अनेक सद्भक्त यथेच्छ हस्तगत करीत. त्यांच्या दर्शनानें, थोड्याशा संभाषणानें व कृपेनें अनेक जीव धन्यतेचा अनुभव घेत. क्षीण प्रकृति असूनहि पुढें ऑक्टोबर ७३ पर्यंत अल्प शब्दांत पण बहुमोल असें मार्गदर्शन भक्त व शिष्य यांना लाभत होते.

ऑक्टोबर ७३ नंतर फक्त दर्शन आणि आशीर्वाद यांचा लाभ असे. १५ ऑगस्ट १९७४ या दिवशीं स्वामीजींनी महासमाधि घेतली. त्यांचें भव्य समाधिमंदिर बांधले गेले असून दर्शनार्थींची तेथें सदैव गर्दी असते. नुकतेंच सन जाने.२००३ ते डिसें.०३ हे वर्ष 'स्वामी स्वरूपानंद जन्म शताब्दि वर्ष' म्हणून मोठ्या उत्साहांत संपन्न झाले. त्यानिमित्ताने स्वामीजींच्या जन्मोत्सव सांगता सोहळ्याच्या दिवशीं स्वामी स्वरूपानंदांचे डाक तिकीट भारतात प्रकाशित झाले.

॥ हरिः ॐ तत्सत् ॥